NOCIL LIMITED
Regd. Office : Mafatlal House, 3rd Floor, H. T. Parekh Marg,
Backbay Reclamation, Churchgate, Mumbai - 400 020, India.
Tel.: +91 22 6657 6100, 6636 4062 Fax +91 22 6636 4060
Website: www.nocil.com CIN : L99999MH1961PLC012003
Email: investorcare@nocil.com
ARVIND MAFATLAL GROUP
The ethics of excellence

**Date:** 02nd August, 2020

**The Bombay Stock Exchange Limited**
"P.J. Towers"
Dalal Street,
Mumbai-400 001
**Scrip Code:** 500730

**The National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai-400 051
**Symbol:** NOCIL

Dear Sir,

**Sub: Newspaper Advertisement – Disclosure under Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

We have enclosed the copies of newspaper advertisement published in the following newspapers in compliance with the General Circulars issued by the Ministry of Corporate Affairs ('**MCA**') dated 08th April, 13th April, and May 5, 2020, and Securities and Exchange Board of India ('**SEBI**') Circular dated 12th May, 2020, for updation of email addresses of the Shareholders for 58th Annual General Meeting of the Company to be held on Friday, 28th August, 2020 at 03:00 P.M. (IST) through Video Conferencing / Other Audio Visual Means.

1. Economic Times (English) Edition dated 01st August, 2020; and
2. Maharashtra Times (Marathi) Edition dated 02nd August, 2020.

Further, the Company has also disseminated the above published information on the Company's website viz., www.nocil.com.

We request you to take the same on your records.

For **NOCIL Limited**

Sd/-
**Amit K. Vyas**
**Assistant Vice President (Legal) and Company Secretary**

**Place:** Mumbai

Encl: as above

# माहिती पुस्तिका नसल्याने गोंधळ




## अकरावी प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर शिक्षण विभागाने अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली. यंदा दहावीच्या निकालानंतर शिक्षण विभागाने अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना यंदा सर्वच प्रक्रिया ऑनलाइन करता येणार आहे. यासाठी विद्यार्थी नोंदणी करत आहेत, मात्र विद्यार्थ्यांच्या हातात माहितीपुस्तिका नसल्याने अनेक बाबतीत संभ्रम निर्माण होत आहेत. याबाबत विद्यार्थ्यांना कोणतेही मार्गदर्शन होत नसल्याने गोंधळ वाढू लागला आहे.

राज्यभरात मुंबई एमएमआर क्षेत्र तसेच पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महापालिकांच्या क्षेत्रात अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाते. या प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ सुरू झाले असून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग एक भरता येणार आहे. पहिल्या टप्प्यातील अर्ज भरल्यानंतर विद्यार्थांना दुसरा टप्पात महाविद्यालय पसंतीक्रम असणार आहे. दरवर्षी अकरावी प्रवेश अर्ज ऑनलाइन भरायचे असले तरी विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्र पडताळणी मार्गदर्शन केंद्रांवर जाऊन करावी लागत होती.

मात्र यंदा करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना कागदपत्रेही ऑनलाइन सादर करता येणार आहेत. तसेच त्यांना प्रवेश शुल्कही ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांना धरबसल्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. मिळालेला प्रवेश निश्चित करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीसाठी कुठेही धावाधाव करू नका, सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आल्या आहेत अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली.

### ऑनलाइन प्रक्रियेस सुरुवात

**पालकही गोंधळले**

प्रवेशासाठी आवश्यक अशी माहितीपुस्तिका आणि वेळापत्रक अद्याप जाहीर न झाल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. हातात पुस्तिकाच नसल्याने कोणत्या कॉलेजांची निवड कशी करावी, त्यांचे शुल्क काय आहे, याची माहितीच विद्यार्थ्यांना मिळत नसल्याने विद्यार्थ्यांना याचा त्रास होत आहे. अनेकांनी प्रवेशसाठीच्या प्रक्रियेचे शुल्क भरलेले असतानाही त्यांना ते दाखवले जात नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

### पहिल्या दिवशीच १,९३,००० नोंदणी

### विद्यार्थ्यांना मार्गदर्शन नाही

**बोर्डनिहाय नोंदणी झालेले विद्यार्थी**

| | |
|---|---|
| राज्य शिक्षण मंडळ | १,७२,३५७ |
| सीबीएसई | ७,२०० |
| आयसीएसई | १०,८२४ |
| आयबी | ३५ |
| आयजीसीएसई | १,२६० |
| एनआयओएस | २७६ |
| इतर | २९५ |

**ग्रेडच्या गुणांबाबत दिलासा**

आयसीएसई आणि आयजीएससीएसई मंडळाच्या विद्यार्थ्यांना ग्रेडमध्ये गुण दिले जातात. त्यामुळे त्यांना दरवर्षी गुणांमध्ये रूपांतर करण्यासाठी धावपळ करावी लागते. मात्र यंदा यामध्ये बदल करण्यात आला असून विद्यार्थांना प्रवेशाच्या संकेतस्थळावरच सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

ॲड. जाई वैद्य
vachak.vishesh@gmail.com

लॉ

# आत्मकेंद्रित प्रेमही घातक

**घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायद्यात छळाचे प्रकार आणि काही प्रमाणात त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला आहे. काही गोष्टींमुळे एखाद्याचा छळ होऊ शकतो, तसं काही गोष्टी न केल्यानेही छळ होऊ शकतो. इतरांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणणारं आत्मकेंद्रित प्रेमही घातकच असतं.**




कायद्याचे बोलू काही

लॉकडाउनमध्ये शहरांमधील गतिमान आयुष्याला खीळ बसली. आयुष्याची गती मंदावली आणि कुटुंबासोबत घालवण्यात येणारा वेळ वाढला. घरातील कामं वाढली. घरातून काम करणाऱ्या व्यक्तींसाठी कामाचा ताण आला. विशेषतः 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्या महिलांना या दुहेरी ताणास सामोरे जावे लागत आहे. घरातील इतर मंडळींना रिकामा वेळ आणि घरातील महिलेला काम आहे, हे पचनी पडणे कठीण गेले. नोकरीसाठी घरातले कोणी बाहेर पडले, दृष्टीआड झाले, की त्या माणसाचं कार्यरत असणे अध्याहृत असते. घरातली स्त्री घरात नजरेसमोर आहे; परंतु घरकाम करायला वेळ नाही किंवा खाण्यापिण्याच्या मागण्या पूर्ण करायला वेळ नाही, हे स्वीकरण्यास संपूर्ण कुटुंबालाच वेळ लागला.




याचा परिणाम म्हणजे, काही ठिकाणी एरवी सहजासहजी बायकांची कामे म्हणून हिणवली गेलेली, एरवी केली गेली नसती अशी कामेही घरातील पुरुषमंडळी करू लागली. घराबाहेर पडल्यावर प्रत्येकालाच आपली स्वतःची वेगळी ओळख, स्वतःचे अवकाश आणि घरातील इतरांपासून औट घटकेचे स्वातंत्र्य मिळते. मित्रमंडळी भेटल्यामुळे ताणतणाव कमी होतो. तरुण मंडळी बाहेर पडली, की ज्येष्ठांना थोडे स्वातंत्र्य आणि शांतता मिळते. सातत्याने इतका काळ एकत्र राहिल्याने, हा एकमेकांपासून मिळणारा छोटासा ब्रेक, प्रत्येकाचे अवकाश आणि स्वतःसाठी द्यायचा वेळ कमी होत गेला. जिथे घरात भरपूर जागा आहे, सुखसोयी आहेत, आर्थिक अडचणी वा चिंता नाहीत, तिथे लॉकडाउनचा संधी म्हणून सकारात्मक वापर केला गेल्याचेही दिसले.

लॉकडाउनमुळे कुटुंबातील माणसे जितकी जवळ आली, तितकाच व्यक्तिगत अवकाश, स्वतःला देण्यासाठी वेगळा वेळ, व्यक्तिस्वातंत्र्य याचं महत्त्वही अधोरेखित झालं. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कुटुंबातील इतरांपेक्षा वेगळी आहे, तिचं स्वतःचं वेगळं अस्तित्व, तिच्या वेगळ्या महत्त्वाकांक्षा आणि अपेक्षा आहेत, वेगळ्या सवयी आणि वेगळ्या गरजा आहेत हे या काळात कुटुंबातील इतरांना जाणवलेच, शिवाय प्रत्येक व्यक्तीलाही स्वतःला त्याची प्रकर्षाने जाणीव झाली. ही या काळातली सगळ्यांत मोठी जाणीव जागृती म्हणायला हवी.

कुटुंब या एकजिनसी मानल्या जाणाऱ्या आणि नात्यांच्या भावनिक पातळीवर घट्ट जोडल्या गेलेल्या व्यक्तिसमूहाला व्यक्तिस्वातंत्र्याचे तसं वावडंच आहे. त्यामुळे एकमेकांच्या आधी न जाणवलेल्या; पण आता खुपणाऱ्या अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. शहरी भागांतून वाढत्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या जाणिवेतून छळाची संकल्पनाही जास्त तरल होत चालली आहे. कुठल्याही वैवाहिक कायद्यात छळाची व्याख्या केलेली नाही; मात्र घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायद्यात छळाचे प्रकार आणि काही प्रमाणात त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला आहे. 'क्रुएल्टी इज अ क्राइम ऑफ कमिशन अँड ओमिशन,' असे म्हटले जाते. काही गोष्टी केल्याने एखाद्याचा छळ होऊ शकतो, तसे काही गोष्टी न केल्यानेही छळ होऊ शकतो. उदाहरणार्थ, मारहाण करणे, टोमणे मारणे, शिवीगाळ करणे यामुळे जसा छळ होतो, तसं संपूर्ण अबोला धरणे, औषधोपचार न करणे, आवश्यक आर्थिक वा शैक्षणिक कागदपत्रं देण्यास नकार देणे यातूनही छळ होतो. हे छळाचे दृष्य प्रकार झाले; परंतु कौटुंबिक नात्यातील आत्यंतिक प्रेमापायी छळ होत असेल तर? प्रेम आणि छळ या परस्परविरोधी कल्पना मानल्या गेल्याने, हा विचारही आपल्याला अतार्किक वाटू शकतो; परंतु प्रेमाच्या नावाखाली एखाद्यावर सतत सत्ता गाजवणे, एखाद्याचे आयुष्य सतत नियंत्रित करण्याचा प्रयत्न करणे, हाही छळाचा प्रकार असू शकतो. मग या आत्यंतिक प्रेमाचे कारण दुसऱ्याचे भले करण्यासाठीच आहे असे का दिले जाईना; मात्र त्याची परिणती दुसऱ्या व्यक्तीच्या भावनांची, आशा-आकांक्षांची, व्यक्तिस्वातंत्र्याची आणि परिणामी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची मुस्कटदाबी होण्यात होत असेल, तर त्यालाही छळच म्हणायला हवे. एकमेकांच्या सततच्या सान्निध्याने आणि इतर काही सकारात्मक करायला नसल्याने, केवळ दुसरा कसा उठतो, बसतो, बोलतो, वागतो, काय कपडे घालतो, कुणाशी बोलतो अशा एक ना दोन, अनेक गोष्टींत सतत कारण नसताना दखल देणे दुसऱ्याला त्रासदायक ठरते, त्यात त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येते, हे लक्षातच न येण्याइतके आत्मकेंद्रित प्रेमही घातकच. असं वागणंही छळ या सदरात मोडू शकते, हा नवा धडा आता कायद्याच्या चौकटीत स्वीकारावा लागणार आहे.

**आपले प्रश्न नेमक्या शब्दांत पाठवा या ई-मेल पत्त्यावर.**
matalegal@gmail

# 'गैरहजर' विद्यार्थिनीची याचिका नामंजूर



म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

वर्षभरात पुरेशी उपस्थिती नसल्याने परीक्षेस बसण्याची परवानगी नाकारल्या गेलेल्या एका विद्यार्थिनीची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. 'वर्षभरातील किमान ७५ टक्के हजेरीच्या अटीमधून मिठीबाई कॉलेज प्रशासनाने काही विद्यार्थ्यांना दिलासा दिला असताना मला तो नाकारण्यात आला. शिवाय मुंबई उच्च न्यायालयात कॉलेजने दोन प्रकरणांत परस्परविरोधी भूमिका घेतली', असा दावा करत एका विद्यार्थिनीने केलेले हे अपील सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळले. त्यामुळे मिठीबाई कॉलेजला मोठा दिलासा मिळाला आहे.

बी. कॉमच्या दुसऱ्या वर्षातील या विद्यार्थिनीने ॲड. हर्षद भडभडे यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. त्यापूर्वी उच्च न्यायालयात केलेली तिची याचिका प्रलंबित होती. अपील फेटाळले गेल्याने ही याचिका निरर्थक झाल्याचे सांगत ती मागे घेऊ देण्याची विनंती ॲड. भडभडे यांनी उच्च न्यायालयाचे न्या. शाहरुख काथावाला व न्या. नितीन बोरकर यांच्या खंडपीठाला केली. ती मान्य करत खंडपीठाने हा विषय निकाली काढला.

### मिठीबाई कॉलेजला न्यायालयीन दिलासा

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्षात एकुण ७५ टक्के व प्रत्येक विषयासाठी ७० टक्के हजेरी लावणे बंधनकारक असते. काही विशिष्ट कारणांखाली यात पाच टक्के कमी हजेरीची सवलत दिली जाऊ शकते. मात्र, 'पूर्वी मिठीबाई कॉलेजने ५९.२ टक्के हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांनाही सवलत देऊन अंतिम परीक्षेला बसू दिले होते. माझी हजेरी ५८.०९ टक्क्यांची असूनही मला परीक्षेला बसण्यास परवानगी नाकारण्यात आली. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला मानसिक अस्वास्थ्यामुळे वैद्यकीय उपचार घ्यावे लागल्याने माझी हजेरी कमी असल्याच्या वस्तुस्थितीकडेही कॉलेज प्रशासनाने दुर्लक्ष केले', असे आक्षेप नोंदवत या विद्यार्थिनीने उच्च न्यायालयात याचिका केली होती.

**निर्णयाची माहिती दडवली**

५९.२ टक्के हजेरी असणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देण्याचा निर्णय कॉलेज प्राचार्यांनी ६ मार्चला घेतला होता. मात्र, याच कॉलेजने सुमारे ५५० विद्यार्थ्यांना अपुऱ्या हजेरीच्या कारणामुळे परीक्षेला बसण्यास मनाई करणारा आदेश काढल्यानंतर त्यातील १०७ विद्यार्थ्यांनी तातडीने उच्च न्यायालयात याचिका केली. त्यावेळी प्राचार्यांच्या ६ मार्चच्या निर्णयाची माहिती न्यायालयापासून लपवण्यात आली होती. त्यामुळे कॉलेजचा नियम लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने १२ मार्च रोजी त्या विद्यार्थ्यांची याचिका फेटाळली होती, असे उघड झाल्याने कॉलेजच्या परस्परविरोधी भूमिकेकडे उच्च न्यायालयाने लक्ष वेधले होते. त्यामुळे त्या पार्श्वभूमीवर, या विद्यार्थिनीने उच्च न्यायालयाच्या १२ मार्चच्या निर्णयाविरोधात अपील करून दिलासा देण्याची विनंती केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली.

# उच्च शिक्षणसंस्थांमध्ये आता शुल्क नियंत्रण

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

नर्सरी ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल सुचविणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात उच्च शिक्षण संस्थांतील शुल्कावर नियंत्रण आणण्याचे सूचित करण्यात आले. यामुळे भविष्यात उच्च शिक्षणातील प्रवेशक्षमता वाढविणे शक्य होईल असा कयास या धोरणात व्यक्त करण्यात आला आहे.

देशात उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे अवघे २९ टक्के आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी नवीन शिक्षण धोरणात अनेक उपाय सुचविण्यात आले आहेत. यापैकी एक उपाय हा शुल्क रचना पारदर्शक करण्याबाबत आहे. नवीन शिक्षण धोरणात सर्व शिक्षणसंस्था या 'ना नफ ना तोटा' या तत्त्वावर चालविण्यात येतात. यामुळे या सर्व संस्थांचे एकसारखे लेखा परिक्षण होणे आवश्यक आहे. संस्थेला नफा होत असेल तर तो निधी संस्थेने शिक्षणक्षेत्रातच गुंतवणे बंधनकारक असेल असेही या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे. सामान्य नागरिकालाही शिक्षण संस्थेतील आर्थिक व्यवहार म्हणजे पैसे कुठून आले व ते कसे खर्च झाले याबाबत माहिती मिळावी या उद्देशाने पारदर्शक योजना करावी, असेही यात स्पष्ट केले आहे. याची जबाबदारी राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेवर सोपविण्यात आली आहे. सर्व उच्च शिक्षणसंस्थांनी त्यांचे शुल्क किती आहे व ते कसे आकारले आहे याबाबत स्पष्टता देणे बंधनकारक राहील. त्यांनी दर्शविलेले शुल्कच विद्यार्थ्यांकडून घ्यावे, त्यापेक्षा जास्त शुल्क घेऊ नये, असेही स्पष्ट केले आहे.

शिक्षणसंस्थांना पुढील १५ वर्षांत टप्प्याटप्प्याने स्वायत्तता दिली जाणार आहे. यानुसार २०३५पर्यंत संस्थांचे नियामक मंडळ शुल्क ठरवू शकणार आहे. मात्र त्यांना सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक असून त्याचे लेखा परीक्षण होणेही बंधनकाकरक असेल, असे या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे. या सुधाणांचे स्वागत होत असले तरी आजही असे कायदे आहेत, मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा सूर शिक्षणक्षेत्रातून व्यक्त होत आहे.

### नवीन शिक्षण धोरणातील महत्त्वपूर्ण बदल



**...तरच शेवटच्या घटकाचा लाभ**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये शिक्षणाचे बाजारीकरणाचे थांबविण्यासंदर्भात नमूद केले असले तरी, खासगी शाळा म्हणजेच विनाअनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या केजीपासून पीजीपर्यंतच्या संस्था या वारेमाप फी आकारत असतात. शिक्षणातील नफेखोरी थांबवायची असेल तर अनुदानितप्रमाणे विनाअनुदानितचे शुल्कही शासनाने निर्धारित करून त्याला कायद्याचा आधार देणे आवश्यक आहे. आजही असे अनेक कायदे आहेत, मात्र त्यांची कठोर अंमलबावणी होत नाही व शेवटच्या घटकापर्यंत त्याचे लाभ पोहोचत नाही. यामुळे या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे मत सहसचिव नॅशनल फॉर्म फॉर क्वालिटी एज्युकेशनचे सहसचिव कुशल मुडे यांनी व्यक्त केले.




# 'प्रोजेक्ट क्रांती'तून दहा जण शासकीय सेवेत

### खेडोपाड्यातील मुलांचे लखलखीत यश

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

सांगलीतील "क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड ज्ञानपीठ" संस्थेने धवधवीत यश मिळवले आहे. या संस्थेच्या "प्रोजेक्ट क्रांती" उपक्रमातील दहा उमेदवारांची यंदा स्पर्धात्मक परीक्षांतून डॉक्टर, विकास अधिकारी, लेखा अधिकारी यांसह विविध शासकीय पदांवर निवड झाली आहे.

या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी पन्नास हजार रुपयांपासून लाखो रुपयांपर्यंत शुल्क संस्थांकडून आकारण्यात येते. गरीब घरातील मुलांची इतकी फी भरण्याची ऐपत नसते ही बाब लक्षात घेऊन सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड ज्ञानपीठ संस्थेने जून २०१७ पासून "प्रोजेक्ट क्रांती" नावाने विनामूल्य स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे.

या वर्षी संस्थेत १५० मुले आणि ८० मुली आहेत. त्यातील दहा जणांनी मोठे यश मिळवले आहे. मुंबई, पुणे, सांगली, नाशिक, औरंगाबाद येथून तज्ज्ञांना पाचारण करून त्यांच्याकडून या मुलांची स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करून घेण्यात आली. या मुलांनीही परिश्रम केल्याने त्याचे फळ त्यांना मिळाले, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश लाड यांनी दिली. सांगितले. हुशार परंतु केवळ गरिबीमुळे चांगल्या नोकरीचा मार्ग बंद असणाऱ्या मुलांना स्पर्धा परीक्षांचा मार्ग मोकळा करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



डॉ. सागर जाधव, डॉ. चेतना सांळुखे, सत्यम पाटील, अभिषेक कदम, नीलम लाड, शरद पवार, विजय लाड, राहुल देवकाते, ज्योत्स्ना जाधव, वैशाली पवार हे विद्यार्थी यंदा उत्तीर्ण झाले असून मुंबई, ठाण्यासह राज्याच्या विविध भागांत त्यांची नियुक्ती होणार आहे.

# रोज २६ लाख सिलिंडर्सचा पुरवठा

म. टा. प्रतिनिधी, मुंबई



करोना संसर्गाच्या काळातही इंडियन ऑइलकडून दररोज २६ लाख धरगुती सिलिंडर्सचा पुरवठा होत आहे. यावरून ही पुरवठा साखळी सक्षम असल्याचे स्पष्ट होत असल्याचे मत इंडियन ऑइलचे संचालक (पणन) गुरमीत सिंग यांनी व्यक्त केले.

देशातील सर्वात मोठ्या इंधन उत्पादन व वितरण कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडियन ऑइलने पुरवठा साखळीसंदर्भातील अहवालाचे नुकतेच प्रकाशन केले. त्यावेळी ते बोलत होते.

'सक्षमता ते लवचिकता : अस्थिर जगात तेल व वायूपुरवठा साखळीची क्षमता वाढवणे', असे या अहवालाचे नाव आहे. कंपनीचे अध्यक्ष श्रीकांत वैद्य यांच्या हस्ते या अहवालाचे वेब प्रकाशन झाले. बोस्टन कन्सल्टिंग समूहातर्फे (बीसीजी) हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

'इंडियन ऑइलने करोनाच्या संकटकाळातही एलपीजी सिलिंडरचा पुरवठा, वंदे भारत अभियानासाठी हवाई इंधन पुरवठा, भारत स्टेज चारसाठीचा इंधनाचा पुरवठा व जम्मू-काश्मीरमध्ये हिवाळ्याआधी इंधनाचा मुबलक साठा करून ठेवला आहे. एकूणच पुरवठा साखळी सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली जात आहेत,' असे गुरमीत सिंग यांनी सांगितले.

'पुरवठा साखळीकडे कायम खर्चाचे प्रभावी माध्यम म्हणूनच बघितले जाते. परंतु कच्च्या इंधनाचे उत्पादन व मागणीतील घट, याचा पुरवठा साखळीवर विपरित परिणाम झाला आहे. परंतु इंडियन ऑइलने या संकटावर मात केली आहे. या अहवालात यावरच विस्तृत प्रकाश टाकण्यात आला आहे,' असे संचालक (पुरवठा) राकेश सेहगल यांनी सांगितले की.

'करोना संकटामुळे जगभरात अनिश्चितता आहे. अशावेळी तेल व वायू कंपन्यांनी सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. त्यासाठी पुरवठा साखळीच्या लवचिकतेवर गुंतवणूक करणे अत्यावश्यक असेल. हेच या अहवालात मांडण्यात आले आहे', असे मत बीसीजीच्या ऊर्जा विभागाचे व्यवस्थापकीय संचालक अनिर्बन मुखर्जी यांनी व्यक्त केले. 'करोना संकटामुळे तेल व वायू कंपन्यांना पुरवठ्यासंबंधी फेरविचार करणे अत्यावश्यक झाले आहे. पुरवठा साखळीत लवचिकता आणणे अत्यावश्यक असेल. त्यासाठी गुंतवणुकीची गरज आहे', असे मत बीसीजीच्या ऊर्जा विभागाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राहुल पैपणंदीकर यांनी व्यक्त केले.

### इंडियन ऑइलची पुरवठा साखळी पुरेशी सक्षम

# आरोग्यमंत्री राजेश टो[pe] यांच्या आईचे निधन

मुंबई : आरोग्यमंत्री राजेश टो[पे] यांच्या आई शारदाताई टोपे य[ांचे] शनिवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमार[ास] बॉम्बे रुग्णालयात दीर्घ आजाराने निध[न] झाले. त्या ७४ वर्षांच्या होत्या.

जवळपास दीड महिनापास[ून] त्यांच्यावर बॉम्बे रुग्णालयाच[्या] अतिदक्षता विभागात उपचार सु[रू] होते. एकीकडे आईची काळजी घे[त] व दुसरीकडे करोना संसर्गाविरोधाती[ल] लढा अशा दोन्ही पातळ्यांवर टो[पे] मागील काही दिवसांपासून ल[ढत] होते. शारदाताई यांना हृदयविकारा[चा] आणि मूत्रपिंडाचा आजार होता, करो[ना] विषाणूच्या संसर्गाच्या सद्यस्थिती[चा] आढावा घेत असतानाही वेळात वे[ळ] काढून ते रुग्णालयामध्ये जात होते.

जालन्यातील कर्मयोगी अंकुशर[ाव] टोपे समर्थ सहकारी सा[खर] कारखान्याच्या त्या अध्यक्ष होत्[या]. शारदाताईंचे निधन हा आमच[्या] सर्वांसाठी मोठा धक्का आहे, ताई[ंनी] ज्येष्ठ नेते अंकुशराव टोपे यांची खंब[ीर] साथ दिली. राज्य मंत्रिमंडळाती[ल] सर्व सहकारी आणि नागरिक टो[पे] कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे[त], अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित प[वार] यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# साठेबाजीचा तांदूळ पोलिसांकडून जप्त

### 33 लाख रुपये किमतीचे धान्य हस्तगत

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई



काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी साठेबाजी करून ठेवलेला तब्बल ३३ लाख रुपये किमतीचा ११० टन तांदळाचा साठा पनवेल शहर पोलिसांनी शुक्रवारी रात्री जप्त केला. पळस्पे येथील पलक रेशन गोडाऊनवर छापा मारून पोलिसांनी ही कारवाई केली. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील गोरगरीब रेशनधारकांसाठीचा हा कोटा असल्याचे पोलिस तपासात उघड झाले. धान्यांचा काळाबाजार करणारी टोळी भेसळ करून हा तांदूळ विदेशात निर्यात करत असल्याचेही तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी भीमाशंकर खाडे, इक्बाल काझी व लक्ष्मणचंद्र पटेल या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्यांच्या शोधात आहेत.

बार्शी येथून अवैधपणे चार कंटेनरमधून आणलेल्या तांदुळाची या गोदामात साठेबाजी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यातील एक आरोपी भीमाशंकर खाडे हा बार्शीतील गोरगरीब नागरिकांसाठीचे धान्य गैरमार्गाने मिळवून ते कंटेनरमधून पनवेलमध्ये लॉजिस्टिकचा मालक इक्बाल काझी याच्याकडे पाठवून देत असे. त्यानंतर काझी ही साठेबाजी करत असे व लक्ष्मणचंद्र पटेल हा या तांदुळात भेसळ करून ते धान्य अन्य गोण्यांमध्ये भरून त्याची निर्यात करत असे. खाडे याच्यावर यापूर्वी मुंबईतील भोईवाडा पोलिस ठाण्यात फसवणूक व अपहाराचा गुन्हा दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

रेशनिंगच्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्या या टोळीने कोट्यवधी रुपये किमतीच्या धान्याचा अपहार करून त्याची काळ्या बाजारात विक्री केली असण्याची शक्यता आहे. या टोळीवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचे परिमंडळ-२चे पोलिस उपआयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले.

एमएमआरडीए MMRDA

**महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित**

(महाराष्ट्र सरकारचा उपक्रम)

Maha Mumbai Metro Operation Corporation

४ था मजला, नामट्री इमारत, प्राधिकरणाच्या नवीन इमारतीजवळ, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in

महामंडळामध्ये खालील नमूद पदे कायमस्वरूपी भरणेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदांचे नांव | अ. जा | अ. ज. | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | वि. मा. प्र. | इ. मा. व | सा. आ. शै. मा | ई. डब्ल्यू. एस. | खुला | एकूण पद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | असिस्टंट मॅनेजर (आयटी) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| २ | सिनियर सेक्शन इंजिनिअर (आयटी) | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | - | ०१ | ०४ |
| ३ | सेक्शन इंजिनिअर (आयटी) | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० |
| | एकुण | ०२ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०३ | ०२ | ०१ | ०५ | १५ |

शासनाच्या /रेल्वे/मेट्रो मध्ये कार्यरत अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालयामार्फत योग्य त्या मार्गाने पाठविण्यात यावेत. तसेच त्यांनी मुलाखतीच्यावेळी ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) सादर करणे आवश्यक आहे.
शैक्षणिक अर्हता, अनुभव, वेतन श्रेणी आणि इतर सर्व माहिती प्राधिकरणाच्या वेबसाईट वर देण्यात आलेली आहे. https://mmrda.maharashtra.gov.in (Divisions -> Administration -> Recruitment) अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१/०८/२०२० असेल.

सही/-
(डि. के. शर्मा)
दिनांक : ३१/०७/२०२० व्यवस्थापकीय संचालक, म.मुं.मे.सं.म.म.

Fulrani

**नोसिल लिमिटेड**

सीआयएन. L99999MH1961PLC012003
नों. कार्यालय : मफतलाल हाऊस, एच. टी. पारेख मार्ग, बॅकबे रेक्लेमेशन, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०. दुर. क्र.: ९१- २२-६६३६४०६२ फॅक्स : ९१- २२- ६६३६४०६०
वेबसाइट : www.nocil.com ईमेल : investorcare@nocil.com

**व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दृकश्राव्य (ओ ए व्ही एम) माध्यमाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कंपनीच्या ५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबतची सूचना**

असे सूचित करण्यात येते की, कोविड-१९ या वैश्विक महामारीमुळे नोसिल **("कंपनी")** लिमिटेडच्या ५८वी वार्षिक सर्वसाधारण सभा **('एजीएम') शुक्रवार दिनांक २८ ऑगस्ट, २०२०** रोजी दुपारी **०३.०० (भा.प्र.वे.)** वाजता कंपनी अधिनियम, २०१३ च्या सर्व प्रयोज्य तरतुदी आणि त्या अंर्तगत केलेली नियमावली सहवाचता कंपनी कामकाज मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेली दिनांक ०८ एप्रिल, २०२०, दिनांक १३ एप्रिल, २०२० आणि दिनांक ०५ मे, २०२० ची सामान्य परिपत्रके **('एमसीए परिपत्रके')** आणि भारतीय सुरक्षा आणि विनियम मंडळाकडून जारी करण्यात आलेले दिनांक १२ मे, २०२० रोजीचे परिपत्रक **('सेबी परिपत्रक')** यांचे अनुपालन करुन व्ही सी / ओ ए व्ही एम च्या माध्यमाद्वारे कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात येईल. या कामकाजाची माहिती आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये देण्यात येईल.
ज्या सभासदांचे ई-मेल कंपनी/ निक्षेपस्थानी भागिदार/ निबंधक आणि हस्तांतरण एजंट यांच्याकडे नोंदविण्यात आलेले असतील, केवळ अशाच सभासदांना इलेक्ट्रॉनिक स्वरुपामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०१९-२० चा कंपनीचा वार्षिक अहवाल यांच्या इलेट्रॉनिक प्रती पाठविण्यात येतील. एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रक यानुसार कोणत्याही सभासदास एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल यांच्या भौतिक प्रती पाठविल्या जाणार नाहीत.
वार्षिक सर्वसाधारण सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या www.nocil.com, या संकेत स्थळावर आणि एन एस डी एल च्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर आणि कंपनीचे शेअर्स ज्या शेअर बाजारामध्ये सूचीबद्ध करण्यात आलेले आहेत त्या शेअर बाजाराच्या www.bseindia.com आणि www.nseindia.com. या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**ई-मेल नोंदविण्याची आणि अद्यावत करण्याची पद्धत:**

ज्या सभासदांनी अजून पर्यंत ईमेल ची नोंदणी केलेली नसेल, अशा सभासदांना विनंती करण्यात येते की, एजीएम ची सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरुपामध्ये प्राप्त करण्यासाठी तसेच रिमोट ई-मतदानाकरिता लॉगिन आय डी आणि पासवर्ड मिळविण्यासाठी त्यांनी आपापल्या ई-मेलची नोंदणी करण्याकरिता खालील नमूद केलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करावे:

१. https://ris.kfintech.com/email_registration/ या लिंक ला भेट द्या.
२. कंपनीचे नाव निवडा - **NOCIL Limited**
३. धारणेचा प्रकार निवडा (भौतिक / CDSL/ NSDL)
४. भौतिक फोलिओ क्रमांक किंवा डी पी आय डी आणि क्लायंट आय डी टाका.
५. प्रथम कॅप्चा टाका आणि नंतर पॅन टाका.
६. अपडेट निवडा / नवीन ई-मेल टाका आणि अपडेट निवडा / नवीन मोबाईल क्रमांक टाका आणि पुढील प्रक्रिया करा.
७. त्यानंतर यंत्रणा एजीएम नोटीस प्राप्त करण्यासाठी सिस्टम ई-मेल पत्त्याची पुष्टी करेल.

ई-मेल ची कायम स्वरुपी नोंदणी करण्यासाठी, अमूर्त स्वरुपामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपआपले ई-मेल त्यांच्या ज्याच्या त्याच्या निक्षेपस्थानी (डीपी) भागीदारांकडे अद्यावत करावे आणि मूर्त स्वरुपामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांना विंनती करण्यात येते की, त्यांनी आपआपले ई-मेल त्यांच्या निबंधक आणि हस्तांतरण एजंट कडे अद्यावत करावे.

**एजीएम च्या दरम्यान रिमोट ई-मतदानाद्वारे किंवा ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पध्दत:**

सभासदांना एजीएम च्या सूचनेमध्ये नमूद केल्या प्रमाणे रिमोट ई-मतदान पध्दतीने कामकाजावर सुदूर पध्दतीने आपले मत नोंदविण्याची संधी देण्यात येईल.
वर दिलेल्या पध्दतीने आपापल्या ई-मेल ची यशस्वीरीत्या नोंदणी केल्यानांतर सभासदांना ई-मतदान करण्यासाठी लॉगिन अधिकारलेख उपलब्ध करुन देण्यात येतील.
कंपनीला आपल्या सर्व सभासदांना एजीएम च्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व ठरावांवर आपले मत नोंदविण्यासाठी एनएसडीएल ची रिमोट ई-मतदान सुविधा **('रिमोट ई मतदान')** पुरविण्याचा आनंद होत आहे. त्याचप्रमाणे कंपनी सभेदरम्यान ई-मतदान सुविधा देखील पुरवील. एजीएम च्या आधी रिमोट ई-मतदानासाठी / एजीएम मध्ये ई-मतदान करण्यासाठीची तपशीलवार प्रक्रिया एजीएम च्या सूचनेमध्ये देण्यात येईल.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**नोसिल लिमिटेडसाठी**
**सही/-**
**स्थळ : मुंबई** **अमित के. व्यास**
**दिनांक : २ ऑगस्ट, २०२०** **सहाय्यक उपाध्यक्ष (कायदेशीर) आणि कंपनी सचिव**